# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २४ — अंक क्र. १


⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘

## नवे वर्ष सर्वांना सुखासमाधानाचे व भरभराटीचे लाभो!

## We wish you all a happy and prosperous New Year!

⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘⌘


कार्यकारिणी समिती
(२००९ — २०१०)

अध्यक्ष
डॉ. प्रियदर्शन मनोहर
(४१२—५२१—२२१४)

उपाध्यक्ष
सौ. संगीता बोकील
(४१२—२२१—७५०२)

सचिव
सौ. नीता शिंदे
(४१२—२२०—२४१०)

कोषाध्यक्ष
डॉ. सौ. अंजली मेढेकर
(४१२—२६९—९४४९)

वार्तापत्र संपादक
डॉ. अरुण जतकर
(४१२—३७२—५२८३)

जाल—संचालक
श्री. राजेश दिवेकर
(३४७—७८२—६४४४)

कार्यकारी सभासद

सौ. मोनिका जाधव
(७२४—९६९—०२५४)

श्री. अक्षय राजहंस
(विद्यार्थी प्रतिनिधी
२१५—९००—२६५०)

डॉ. सौ. मीनल देशमुख
(७२४—७४१—६३४२)

डॉ. सौ. माधुरी गोडसे
(४१२—७६७—९२७९)

श्री. तेजस पेवेकर
(७२४—९१६—४९७६)

सौ. मनीषा भामरे
(४१२—७७२—८६०३)


नमस्कार मंडळी!

२०१० सालाच्या कार्यकारिणी समितीकडून आपणा सर्वांना नव—वर्षाच्या शुभेच्छा!

गेली दोन वर्षे महाराष्ट्र मंडळाची धुरा समर्थपणे वाहणारे श्री. अजय बेळंबे आणि त्यांच्या कार्यकारिणी समितीचे सभासद यांचे नव्या कार्यकारिणी समितीकडून मनःपूर्वक आभार! त्यांनी गेली दोन वर्षे उत्तमोत्तम कार्यक्रमांचे संयोजन करून मंडळाच्या कार्यक्रमांचा दर्जा खचितच उंचावला आहे. हा दर्जा टिकवणं आणि त्यात जमेल तितकी भर घालणं हे आमच्या नव्या समितीपुढे मोठं आव्हान आहे. हे आव्हान यशस्वीपणे पेलायचा सर्वतोपरी प्रयत्न आम्ही सगळे निश्चितच करू.

नव्या कार्यकारिणी समितीने आयोजित केलेला पहिला कार्यक्रम — मकर संक्रांत — दि. १६ जानेवारी रोजी हिंदु—जैन मंदिरात थाटामाटात साजरा झाला. सुमारे २२० सभासदांच्या विक्रमी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा आली. चहा—कॉफी—मिसळ—पुलाव—पीत्झा—गाजर हलवा आणि सॅलड असा बेत, जोडीला गप्पाष्टके आणि नवीन सभासदांच्या ओळखी, अशा अनौपचारिक आणि खेळीमेळीच्या वातावरणाने कार्यक्रमात रंग भरला.

नव्या कार्यकारिणी समितीने मंडळासाठी काही नव्या कल्पना मांडल्या आहेत. त्यांची माहिती संक्रांतीच्या समारंभात देण्यात आली होती. ती माहिती खालीलप्रमाणे —

— पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाच्या नव्या दिशा —

(१) आजच्या घटकेस नीलपत्रधारी सभासदांची संख्या ७३ आहे (संपूर्ण यादी पान ५ वर पहावी). नवी समिती सभासदांची संख्या तीन आकडी करण्याचा कसोशीने प्रयत्न करणार आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने ह्या प्रयत्नांस यश लाभो!

(२) २०१० सालाची दिवाळी ही आपल्या मंडळाची रौप्यमहोत्सवी दिवाळी आहे. या निमित्ताने मंडळाची स्मरणिका ('वाटचाल') व नामदर्शिका (Directory) प्रसिद्ध करण्याचे योजले आहे. ज्यांना या स्मरणिकेच्या संदर्भात छायाचित्रे, लेख, आठवणी, माहिती, वगैरे सादर करायची इच्छा असेल, त्यांनी अध्यक्ष डॉ. प्रियदर्शन (ऊर्फ सुधीर) मनोहर (Tel: 412-521-2214; E-Mail: pmanohar63@hotmail.com) किंवा समितीचे इतर सभासद यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. सध्याच्या नामदर्शिकेत आपले नाव, पत्ता, फोन नं., ई—मेल पत्ता वगैरे योग्य आहेत की नाहीत ह्याचा तपास घ्यावा आणि नसल्यास योग्य माहिती मंडळाच्या सचिव सौ. नीता शिंदे यांना लवकरात लवकर कळवावी.

(३) वाढत्या महागाईमुळे मंडळाचा खर्च वाढतच आहे. त्याचबरोबर नवनवे कार्यक्रम आयोजित करायचे असतील, किंवा भारतातून पाहुणे कलाकार बोलवायचे असतील, तर त्यांचा खर्चही बराच येतो. या खर्चाची मिळवणी करण्यासाठी 'प्रायोजक योजना' (sponsorship scheme) जाहीर करीत आहोत –

'प्लॅटिनम प्रायोजक' – डॉ. ५०० हून अधिक देणगी – व्यासपीठावर जाहीर सत्कार, वार्तापत्रात नामनिर्देश व जाहिरातीचा अधिकार
'सुवर्ण प्रायोजक' – डॉ. २५० हून अधिक देणगी – वार्तापत्रात नामनिर्देश व जाहिरातीचा अधिकार
'रौप्य प्रायोजक' – डॉ. ५०हून अधिक देणगी – वार्तापत्रात नामनिर्देश

प्रत्येक कार्यक्रमासाठी 'प्रायोजक योजना' उपलब्ध केली जाईल. मंडळाचे सभासद या योजनेद्वारे मंडळाचा आर्थिक पाया भक्कम करतील अशी आशा आहे.

(४) 'सेतु बांधा रे!' – पिट्स्बर्गमधे पाच वर्षांहून अधिक काळ स्थायिक झालेल्या सभासदांनी नवागतांना आपल्या घरी बोलवावं आणि त्यांच्याशी परिचय करून घ्यावा असं नवी समिती सर्वांना आवाहन करीत आहे. त्याचप्रमाणे ह्या वर्षी आपल्याला नवीन असलेल्या एका तरी कुटुंबाशी ओळख करून घ्यावी आणि मैत्रीचे सेतु बांधावे ही सर्वांना नम्र विनंति.

(५) पिट्स्बर्गमधील तरुण मराठी पिढीची संख्या वाढते आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. ह्या पिढीच्या एकमेकांच्या संपर्कात राहण्याच्या पद्धती आणि गरजा वेगळ्या आहेत हे ध्यानात घेऊन समितीने 'फेसबुक' या संकेतस्थळाचा (web site) उपयोग केला आहे. फेसबुकवरील MMPGH ह्या समूहाचे सदस्यत्व घेतल्यास पिट्स्बर्गमधील तरुण मराठी पिढीला एकमेकांशी संपर्क साधून माहितीची देवाणघेवाण करणं सोपं जाईल. तसेच समवयस्कांचे साह्य (peer support) आणि तरुण पण अनुभवी मंडळींकडून मार्गदर्शन (mentoring) या गोष्टीही साध्य करता येतील. अधिक माहितीसाठी डॉ. सौ. मीनल देशमुख (Tel: 724-741-6342; E-mail: meenaldeshmukh@yahoo.com) यांच्याशी संपर्क साधावा.

The new executive committee is proposing some new ideas for the operation of the Mandal. These were announced verbally during the Sankranti program on January 16 –

(1) To date the number of blue card memberships is 73. The new committee will make every effort to take this number to 100 and beyond. We solicit your cooperation to achieve this goal.

(2) Diwali this year will mark the 25th anniversary of the founding of our Mandal. In commemoration of this event, we plan to publish a souvenir and the directory. Those who wish to share with the rest of the members the favorite photographs from the past Mandal programs, memories of past 24 years, articles about the Mandal and so forth should contact Dr. Priyadarshan Manohar (Tel: 412-521-2214; E-Mail: pmanohar63@hotmail.com). Please also check the current directory and make sure that your name, address, phone no. etc. as they appear in the current directory are accurate. If any changes need to be made, please inform the Mandal Secretary Mrs. Neeta Shinde (Tel: 412-220-2410, E-Mail: neetashinde128@gmail.com).

(3) With the costs of goods and services going up, Mandal expenses are on the rise. Also, it costs much more these days when you wish to organize a new program or when you wish to invite an artist from India to come and perform here. In order to be able to meet these expenses the executive committee wishes to propose a sponsorship scheme –

- **Platinum sponsor** - Cash Gift of $ 500 or more – These sponsors will be publicly recognized on the stage, their name will be mentioned in the newsletter and will be given a right to publish their own advertisement in the newspaper.
- **Gold Sponsor -** Cash Gift of $ 250 or more – These sponsors' names will be mentioned in the newsletter and will be given a right to publish their own advertisement in the newspaper.
- **Silver Sponsor –** Cash Gift of $ 50 or More **–** These sponsors' names will be published in the newsletter.

(4) Building Bridges – The committee proposes that those members who have resided in Pittsburgh and surrounding areas for five years and more should invite the newcomers to their own house and get to know them well. Similarly, each long-time resident should make it an objective to get to know at least one member family with which there was no previous contact of any kind.

(5) The number of young Marathi folks in Pittsburgh is increasing. Since the needs and methods of the younger generation for staying in touch with each other are vastly different from those of the older generations, the new executive committee has set up a special group (MMPGH) at the FACEBOOK web site. By becoming a member of this group, the younger generation will be able to stay in touch with each other. It will also facilitate peer support and mentoring. For more information please contact Dr. Mrs. Meenal Deshmukh (724-741-6342; E-mail: meenaldeshmukh@yahoo.com).

## — मंडळाचे आगामी कार्यक्रम (Future Programs of the Mandal) —

- रविवार, दि. २१ मार्च; दुपारी २:४५ — गुढी पाडवा — इंगोमार मिड्ल् स्कूल, श्री. श्रीधर फडके यांचा सुमधुर गीतांचा कार्यक्रम, "फिटे अंधाराचे जाळे"

Sunday, 21st of March, 2:45 PM – Gudhî Pâdwâ – Ingomar Middle School, Mr. Shreedhar Phadke presents a recital of songs "Phite Andhârâche Jâle"

- शनिवार, दि. १५ मे, दुपारी ४:०० — श्री वेंकटेश्वर मंदिराचे सभागृह — "रंगसंगीत" — एक धमाल विनोदी एकांकिका आणि मध्यंतरानंतर पिट्स्बर्गच्या तरुण पिढीने निर्मिलेला 'नृत्यांद्वारे जागतिक संस्कृतिदर्शन' ह्या सूत्रावर आधारित बहारदार नृत्यांचा कार्यक्रम.

Saturday, 15th of May, 4:00 PM – S.V. Temple Auditorium – 'Ranga-Sangeet' – A laugh-a-minute one act play, followed by a dance program created by the young Pittsburghers to venerate the Cultures of the World through dances.

- शनिवार, दि. १२ जून, सकाळी ११ — एल्म ग्रोव्ह पार्क येथे सहल आणि सहभोजन

Saturday, 12th of June, 11:00 AM – Elm Grove Park - Picnic

- रविवार, दि. १२ सप्टेंबर, सकाळी १० — गणेश चतुर्थी — हिंदु—जैन मंदिर, श्री गणेश पूजा आणि महाप्रसाद

Sunday, 12th of September, 10:00 AM – GANESH CHATURTHI – Hindu-Jain Temple - Shree Ganesh Pûjâ followed by Lunch.

- शनिवार, दि. १३ नोव्हेंबर, दुपारी ४:०० — दिवाळी — स्थळ ठरायचे आहे.

Saturday, 13th of November, 4:00 PM – DIWALI – Venue yet to be finalized.

## २००९ सालाच्या दीपावली समारंभाचा आढावा

सुमारे ३००हून अधिक सभासदांनी दिवाळीच्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला होता. दिवाळीचा चमचमीत फराळ बनवून आणणाऱ्या खालील सभासदांचे मनःपूर्वक आभार —

चकली — अमिता आंबे, अमिता मुल्हेरकर, अनघा मनोहर, मनाली साने, स्वरूप नेमळेकर

करंजी — निमा कार, निवेदिता बदामी, पूजा त्रिपाठी, शकुंतला शिंदे, स्वाती मुजुमदार

लाडू — अश्विनी साळुंके, मीनल देशमुख, मिता लोवलेकर, स्वाती उमरेडकर

चिवडा — अनघा लेले, अस्मिता रंगनाथन, मृणाल सबनीस, मुक्ता वालावलकर, संगीता बोकील

शंकरपाळी — अर्चना चौक, ज्योत्स्ना फुले, विनीता बेळंबे

शेव — प्राजक्ता करवंदे, शिल्पा साबू, सोनाली पाटील

त्याचप्रमाणे दिवाळीच्या रॅफलसाठी बक्षिसांच्या रूपाने आर्थिक साह्य केल्याबद्दल खालील संस्थांचे आणि मंडळाच्या सभासदांचे मनःपूर्वक आभार —

- फ्लेवर ऑफ इंडिया (साने परिवार)
- मन्रोविल् कुमॉन (अनिता हत्तंगडी, सीमा पाटकर)
- डॉ. संजय आणि सौ. सुचिता लंबोर
- झायका रेस्ट्रॉं, प्लम्
- इंडिया बझार, मन्रोविल्
- पटेल ब्रदर्स, मन्रोविल्
- उडीपी रेस्ट्रॉं, मन्रोविल्
- ताजमहाल रेस्ट्रॉं, मन्रोविल्
- शांति सुपरमार्केट

चहा—कॉफी, फराळ, गप्पाटप्पा व दीपावली अभीष्टचिंतन यांसाठी राखून ठेवलेला अवधी संपल्यानंतर लक्ष्मी— आणि गणेश—पूजनाने मनोरंजनाच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्वांनी एकूण २२ चिजा सादर केल्या. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पीयूषा साने व कु. सानिया सबनीस यांनी केले.

मनोरंजनाच्या कार्यक्रमानंतर वार्षिक सर्वसाधारण सभा भरवण्यात आली. सभेत नव्या कार्यकारिणी समितीची निवड करण्यात आली. (नव्या समितीच्या सभासदांची नांवे पहिल्या पानावर पहावीत).

सर्वसाधारण सभेनंतर सभासदांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. भोजनानंतर दांडिया नाचाची सुरुवात झाली. नाचासाठी खालील कलाकार—सभासदांनी वाद्यसंगीताची आणि गीतगायनाची साथ दिली —

• विनीता बेळंबे • नितिन हत्तंगडी • शकुंतला शिंदे • मिता लोवलेकर • प्रमोद नेमळेकर • गिरीश गोडबोले • प्रदीप फुले • हर्षल मुल्हेरकर

या सर्व गायक—वादकांचे आभार आणि हार्दिक अभिनंदन.

रॅफल्ससाठी एकूण १४ बक्षिसे ठेवली होती. रॅफल्सच्या तिकिटविक्रीतून ३५९ डॉलर जमा झाले. ही रक्कम एकल विद्यालयाला देणगी देण्यासाठी राखून ठेवली आहे.

फराळाची तजवीज, मनोरंजनाचे कार्यक्रम, जेवणाचे वाढप, लहान मुलांची देखरेख, हॉलची स्वच्छता आणि सजावट अशा नानाविध जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडून दिवाळीचा कार्यक्रम यशस्वी करण्यास प्रचंड हातभार लावणाऱ्या स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार!

२००९ साल संपण्यापूर्वी एकल विद्यालयाला ७३० डॉलर्सची देणगी पाठवण्यात आली.

## ऋणनिर्देश

- डॉ. दिलीप व सौ. निमा कार यांनी दरवर्षीप्रमाणे २००९ सालीही गणेशपूजेच्या तयारीची जबाबदारी उचलली. कार पतिपत्नींचे मनःपूर्वक आभार!
- २००९ सालाच्या दिवाळीच्या कार्यक्रमासाठी केलेल्या आर्थिक साह्याबद्दल डॉ. निरंजन आणि सौ. सुधा दीक्षित यांचे मनःपूर्वक आभार!
- या वर्षीचा संक्रांतीचा कार्यक्रम यशस्वी करण्यास अनेक सभासदांनी उस्फूर्तपणे हातभार लावला. कार्यकारिणी समितीचे सभासद व त्यांचे कुटुंबीय यांनी तर मदत केलीच, पण कार्यकारिणी समितीचे पदस्थ नसलेल्या पुढील सभासदांनीही बहुमोल मदत केली; त्यांचे विशेष आभार — शंतनु भिडे, दिलीप बाळसराफ, कुमार आपटे, पिट्स्बर्ग विद्यापीठाचे विद्यार्थी सौरव, चैतन्य, आदित्य आणि शेषन.

- सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार. तुमच्या मदतीशिवाय संक्रांतीचा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला नसता!
- सौ. अनघा मनोहर यांनी प्रायोजित करून आणि बनवून आणलेल्या मिसळीमुळे कार्यक्रमाची लज्जत अधिकच वाढली.

◆◆◆

नव्या कार्यकारिणी समितीकडून सर्व सभासदांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा!

*संक्रांतीच्या सणासुदीला घोर नसू दे थंडी।*
*सूर्य निघाला उत्तरेकडे जुंपुनि बारा घोडी।*
*तिळागुळाच्या भेटीमधुनी जिभेस येई गोडी।*
*सुवासिनींच्या वाणांमधुनी शुद्ध मैत्रिची जोडी॥*

◆◆◆

रविवार दि. ३१ जानेवारी रोजी 'आनंदी आनंद गडे' या डॉ. मनोहर–लिखित एकांकिकेचा प्रयोग वॉशिंग्टन डी. सी. मधील महाराष्ट्र मंडळाने आयेजित केला. सुमारे ३०० प्रेक्षकांनी या एकांकिकेचा आनंद मनसोक्त लुटला. 'आनंदी आनंद गडे'च्या सर्व कलाकारांतर्फे श्री. कुमार आपटे यांना रंगमंचामागील साह्यासाठी खास धन्यवाद! संदीप सबनीस आणि अनघा मनोहर यांचे दिग्दर्शन, निकिता बोकील हिचे संगीत आणि रत्नाकर मुजुमदार यांचे नेपथ्य लाभलेल्या ह्या प्रयोगात संदीप सबनीस, अनघा मनोहर, शंतनु भिडे, संगीता बोकील, चिराग आणि तन्मय मनोहर आणि आदिती शिंदे या कलाकारांचा सहभाग होता. (गेल्या वर्षी पिट्स्बर्गमधे दि. १२ सप्टेंबर २००९ रोजी 'रंगसंगीत' या कार्यक्रमात याच संचाने ही एकांकिका सादर केली होती).

◆◆◆

आतापर्यंत नीलपत्रधारी सदस्य झालेल्यांची यादी पुढील पानावर पहावी –

## Blue Card Members for 2010

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Ananthsubramanian Seshan | 38 | Lele Milind & Anagha |
| 2 | Apte Devdatta | 39 | Lovalekar, Tushar & Mita |
| 3 | Badami Mohan & Nivedita | 40 | Mahajan Rajendra & Laxmi |
| 4 | Balsaraf Dilip & Srikhande Neeva | 41 | Manohar Priyadarshan & Anagha |
| 5 | Belambe Ajay & Vinita | 42 | Medhekar Neeraj & Anjali |
| 6 | Bhamre Vilas & Manisha | 43 | Moghe Vinayak & Sucheta |
| 7 | Bhatte Harshad & Nivedita | 44 | Mujumdar Ratnakar & Swati |
| 8 | Bhavsar Saurabh | 45 | Mulherkar Harshal & Amita |
| 9 | Bhende Shailesh & Mananda | 46 | Nemlekar Pramod & Swarup |
| 10 | Bhide Shantanu & Veena | 47 | Pai Gitanjali |
| 11 | Bokil Sangeeta & Shailesh | 48 | Paranjape Anjali & Shirish |
| 12 | Chaudhari Narayan & Neela | 49 | Patil Rajesh & Sonali |
| 13 | Chauk Srinivas & Archana | 50 | Patil Rajeev & Sangita |
| 14 | Dandekar Sameer & Smita | 51 | Patkar Shailesh & Seema |
| 15 | Deoras Bhanu | 52 | Pearce Usha |
| 16 | Deoras Sunil & Kiran | 53 | Pevekar Tejas & Deepali |
| 17 | Deshmukh Uday and Meenal | 54 | Phatak Achala |
| 18 | Dharmadhikari Vishnu & Vasudha | 55 | Pore Yashodhan |
| 19 | Divekar Rajesh & Preeti | 56 | Potdar Arun |
| 20 | Dixit Niranjan & Sudha | 57 | Rajhans Akshay |
| 21 | Fulay Pradeep & Jyotsna | 58 | Ranganathan Asmita |
| 22 | Ghate Vijay and Sandhya | 59 | Raundhal Mahesh |
| 23 | Ginde Kaustubh & Mayura | 60 | Sabnis Sandeep & Mrunal |
| 24 | Godbole Girish & Deepa | 61 | Saboo Santosh & Shilpa |
| 25 | Godse Raveendra & Madhuri | 62 | Salgarkar Advait |
| 26 | Hattangady Nitin & Anita | 63 | Salunkhe Bipin & Ashwini |
| 27 | Hegde Subhash & Vaishali | 64 | Sample Vivek & Purnima |
| 28 | Jadhav Manish & Monica | 65 | Sane Mahesh & Manali |
| 29 | Jatkar Arun & Shobha | 66 | Shete Prakash & Leena |
| 30 | Joag Shreeya | 67 | Shinde Nitin & Sunita |
| 31 | Kalbhor Chetan & Sonavne Sonali | 68 | Shinde Dilip & Shakuntala |
| 32 | Kamat Nitin & Sonal | 69 | Telang Rahul & Ashwini |
| 33 | Kaneri Anup & Sharada | 70 | Thakar Girish & Leena |
| 34 | Kar Dilip & Nima | 71 | Tripathi Ravi & Pooja |
| 35 | Karawande Vivek & Prajakta | 72 | Vaidya Minal |
| 36 | Kotwal Deepak & Nirmal | 73 | Velankar Sachin & Laxmi |
| 37 | Lambore Sanjay & Suchita | | |